“ज्योतीचे जग”

## ६४ वर्षे कर्तृत्व गाजवलेल्या अहल्या चारी या प्रशिक्षिकेची ही कथा. भारतातील कित्येक शाळा, महाविद्यालये, अगदी केंद्रीय शिक्षण संस्थान (सीआयई), राष्ट्रीय शिक्षण संस्थान (एनआयई), मैसुर प्रादेशिक शिक्षण महाविद्यालय (एमआरसीई) आणि कृष्णमूर्ती स्कूल्स या नि अशा शिक्षणसंस्थांच्या जडणघडणीत गेल्या काही दशकांचे बाईंचे योगदान. अहल्याजींची शिक्षणक्षेत्रातील असामान्य मजल ही जगण्याचा अर्थ लावण्याच्या प्रयत्नांची त्यांची स्वत:ची अंतर्यामीची यात्रा आहे.

कार्य हा जीवनाचा केंद्रबिंदू असल्याचा विश्वास प्रकट होतो आज ८८ वर्षे वय असलेल्या अहल्या चारींमधून. चेन्नईमधील कृष्णमूर्ती फौंडेशनच्या मुख्यालयातील वसंतविहार या त्यांच्या निवासाभवतालच्या प्रशांत निसर्गाला अवलोकत, वाचनाने त्यांचा दिवस सुरू होतो. सामान्यत: त्यानंतर दिवसभरात विविधप्रकारचे लोक मार्गदर्शन घेण्यासाठी त्यांना भेटत राहतात. एखाद्या विशिष्ट दिवशीमात्र त्यांना वाचन आणि संगीतश्रवणासाठी एकांत हवासा वाटतो. कार्य आणि जीवनशैली यांमधील संतुलन संभाळणे हे त्यांच्यासाठी नवे नाही. त्यासाठीच तर त्या गेली कित्येक वर्षे खपताहेत.

१९२१ साली रंगूनमध्ये जन्मलेल्या अहल्याजी ब्रह्मदेशात स्थायिक झालेल्या तमिळ ब्राह्मणांच्या तिसऱ्या पिढीच्या प्रतिनिधी. त्यांच्या वडिलांना सन १८९८ मध्ये डॉ. ॲनी बेझंट यांनी बनारस येथे स्थापन केलेल्या ”केंद्रीय हिंदू मुलांची शाळा आणि महाविद्याल” या संस्थेत शिकण्यासाठी रंगूनहून धाडण्यात आले होते. महाविद्यालयीन शिक्षण संपवून ते रंगूनला परतले आणि ज्या थिऑसॉफिकल सोसायटीने त्यांच्या शिक्षणाची सोय केली होती तिच्याच एका शाळेत मुख्याध्यापक या पदावर रुजू झाले. सोळाव्या वर्षी लग्न झालेल्या अहल्याजींच्या आईंनी मुलांना मोठे करण्यातून थोडी उसंत मिळताच स्वत:चे शिक्षण पूर्ण केले.

सुरवातीला अहल्याजी इंग्रजी माध्यमाच्या मुलींच्या कॉन्व्हेंट शाळेत जायच्या. वाडवडिलांच्या भूमीपासून दूर, नवख्या ठिकाणी, इंग्रजांनी चालवलेल्या शाळेतील अनुभवांतून बाईंनी जीवनविषयक महत्त्वाचे धडे

घेतले जणू. शिस्त आणि सर्वंकषता या गुणांचा त्यांच्या शाळेने घडोघडी आग्रह धरला तो संस्कार आजही बाईंच्या जिवनात जागा असल्याचे जाणवते. इंग्रजांच्या या शिक्षणपद्धतीने उद्दिष्ट्य ठरवून शिकण्यासाठी मुलांच्या मनात आवड निर्माण केली. चारींच्या घरच्या वातावरणात एकात्मता, सत्यशीलता, ध्येयाभिमुख अभ्यास तसेच प्रेम आणि सद्भावना या गुणांचा आदर होता. “आधीच्या पिढीने घालून दिलेल्या नियमांबद्दल कसलाही किंतु मनात न धरता केवळ अनुकरणशीलता, आज्ञापालन आणि अवलंबन हे आमच्या अंगवळणी पडलेले” अहल्याजी मला म्हणाल्या.

आठवीत असताना त्या आपल्या वडिलांच्या शाळेत दाखल झाल्या तिथे त्यांची थिऑसॉफिस्ट लोकांच्या विश्वात्मक संस्कृती या भावनेशी पहिल्यांदा ओळख झाली. आज ज्याला निधर्मी म्हटले जाते तशा वातावरणात नकळत आम्ही वाढत होतो. “सर्व देशीच्या सर्व संप्रदायांच्या लोकांनी एकत्र राहण्यावर आमचा विश्वास होता”. निधर्मी विचारांचा पगडा वगळता आणखी कोणत्याही प्रकारचे राजकीय संस्कार अहल्याजी अथवा त्यांच्या मित्रमंडळावर झाले नाहीत. “इंग्रजांचे राज्य असलेल्या ब्रह्मदेशातले आम्ही भारतीय, एका साम्राज्याचे दास अशाप्रकारची जाणीव नव्हतीच आम्हाला” बाई पुढे सांगतात.

“विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात रंगूनमध्ये राहण्यात वेगळीच गंमत होती. मी पहिल्यांदा रेडियो ऐकलेला मला आठवतं. आकाशवाणीवरून प्रसारीत करण्यात आलेला पहिला आवाज राजा एडवर्ड आठवा याचा, ज्याने आपल्या प्रेयसीबरोबर विवाहबद्ध होण्यासाठी सिंहासनाचा त्याग केला. आम्ही सगळे त्याचे भाषण ऐकत होतो. कार्यक्रम संपला तेव्हा माझे वडिल इंग्लंडने दाखवलेल्या तत्वनिष्ठेवर खूष होऊन बोलताना ऐकले मी. खरंतर कुणालातरी असे करावे लागले याचे मला वाईट वाटलेले पण मी माझे मत मांडू शकले नाही की त्यावर एखादा प्रश्नही विचारला नाही”. बाई सहज सांगतात.

नवनवे तंत्रज्ञान पाश्चिमात्यांकडून इंग्रज वसाहतीत पोहोचत होते. परिणामत: विसाव्या शतकाच्या सुरवातीस ब्रह्मदेशातील मुलांनी अनुभवलेलं जीवन तेव्हाच्या सातासमुद्रापलिकडील जीवनापेक्षा वेगळं नव्हतं. अहल्याजी त्यांच्या आत्यासोबत चार्ली चॅप्लीनच्या सिनेमांसारखे मूकपट पहायला जायच्या. त्याच काळात शर्ली टेम्पल कर्ली टॉप या चित्रपटात पडद्यावरची बालिका बोलायला लागली. (शर्ली या अनाथ, खट्याळ कन्येस ती राहत असते त्या अनाथालयाचे एक तरूण, श्रीमंत विश्वस्त दत्तक घेऊन बाल्य बहाल करतात याची ती कहाणी), चित्रपटातील संवाद ऐकू येण्याचा तो पहिलाच अनुभव, अवाक श्रोत्यांचा उभे राहून उस्फूर्तपणे टाळ्यांचा जल्लोष...

“आम्ही तिथे मेणबत्ती लावून शांत बसायचो, ध्यान करत असल्यासारखे” बालपणी रम्य खेडोपाड्यातून केलेली भ्रमंती आणि अनेक पॅगोडांना दिलेल्या भेटी अहिल्याजींना स्मरतात.

अहल्याजींना भारतीयत्वाची जाणीव करून देणारा पहिला प्रसंग त्या १२ वर्षांच्या असतानाचा. आईबरोबर त्या रंगूनमधील एका महिला-सभेला गेल्या होत्या. एका अनोळखी, अर्ध्या वस्त्रातल्या, अत्यंत हसऱ्या मनुष्याचे दर्शन त्यांना किंचित धक्कादायक होते. का कोण जाणे, त्याच्या भाषणानंतर अनेक स्त्रियांनी स्वत:च्या हातातील बांगड्या आणि अनेक अलंकार काढून त्याने पसरलेल्या कपड्याच्या चौपदरीत दान केले. आपल्या आईनेही त्याच्या झोळीत काही पैसे टाकले हे अहल्याजीनी थोड्याशा अविश्वासानेच पाहिले. हो, ते महात्मा गांधी होते. भूतकाळात पोहोचलेल्या अहल्याजी सांगतात, “घरी परतताना मी आईला विचारलं, कोण आहेत हे वृद्ध गांधीबाबा? बायकांनी त्यांना इतके पैसे का दिले?” आईने मला स्वातंत्र्यासाठी झगडत असलेल्या हिंदुस्तान या इंग्रजांच्या तत्कालीन वसाहतीबद्दल सांगितले. त्यावर अत्यंत अस्वस्थ होऊन मी म्हणाले, “इंग्रजानी का चालते व्हायचे? ते तर किती छान आहेत. मला माझ्या शाळेतील बाई इथेच राहायला हव्यात”

रंगून विद्यापिठात शिकत असताना अहल्याजींनी इंग्लिश मुख्य नि जोडीला इतिहास असे विषय घेतले. भारतातील असंतोषाचे वारे तोपर्यंत रंगूनमधील तरूणांपर्यंत पोहोचले होते. जवाहरलाल नेहरूंची रंगून विद्यापिठाला भेट नि त्यांच्या भाषणाने मंत्रमुग्ध श्रोते अहल्याजीना आठवतात. बाईंनी त्या काळात मुलामुलींचे सहशिक्षण आणि सामाजिक सुधारणा यासारख्या राजकारणाशी निगडीत नसलेल्या विषयांवरील वादविवादात बरोबरीच्या मुलांसोबत हिरीरीने भाग घेतला. आजच्या जगद्‌विख्यात औंग सान सू क्यी चे वडिल हे तेव्हा बाईंच्या पुढे दोन वर्षे शिकत असलेल्या अशा मुलांपैकीच एक.

अहल्येचे पदवी शिक्षण पूर्ण होतेय इतक्यातच १९४१ मध्ये दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या झळा पूर्वेकडे पोहोचल्या. ब्रह्मदेश पादाक्रांत करण्याच्या धमक्या जपानकडून दिल्या गेलेल्या. अग्निवर्षाव करणारे बॉब घरांवर पडले त्या ऐनवेळी कित्येक महिन्यांपासून केलेली तयारी कामी आली नाही. अवसान गळालेल्या लोकांना पळून जाण्यापेक्षा दुसरे सुचले नाही. रेल्वे, गाडी, मिळेल त्या वाहनाने प्रवास करत, प्रसंगी चालतही पुढचे चार महिने चारींचे कुटूंब ब्रह्मदेशाच्या अंतर्भागातून दिशाहीन भटकत राहिले. “त्या पळापळीतून जीवनावर भरवसून राहायचे नाही हे आम्ही शिकलो” इति बाई.

श्वेबो येथिल निर्वासितांच्या छावणीत आश्रय शोधत असतांनाच चारींना अहल्याजींच्या वडिलांच्या एका जुन्या विद्यार्थ्याने ओळखले. त्याच्या कृपेने हे लोक तिथून विमानाने कोलकत्याला पोहोचले नि तिथून पुढे त्यांना माहित असलेल्या भारतातील एकमेव स्थळी, बनारस येथे रवाना झाले.

मागे वळून पाहतांना अहल्याजींची बनारसमधली वर्षे ही योजनेबरहुकूम पार पडली असावीत असे वाटते. पण त्यांच्यामते तेव्हा तरी त्यांच्याकडे कसलेच नियोजन नव्हते. “मी जीवनशरण होते. एखादी नोकरी अथवा व्यवसाय करण्यासाठीही मी कधी अर्ज केला नाही”. बनारस हिंदु सोसायटीमधून पदव्युत्तर शिक्षण

पूर्ण केल्यानंतर अहल्याजींना केवळ स्त्रियांसाठी असलेल्या वसंत कॉलेजमध्ये अधिव्याख्याता या पदावर पाचारण करण्यात आले.

रंगूनमधील आपल्या वडिलोपार्जित घराच्या दर्शनी भागात लावलेला श्रीमती बेझंट यांचा फोटो पाहत मोठ्या झालेल्या अहल्याजींना बेझंटबाईंचे असामान्य जीवन आणि त्यांचे भारतीयांच्या शिक्षणातील योगदान याविषयी खऱ्या अर्थाने जाणीव झाली ती स्वत: प्रशिक्षिका बनल्यानंतरच. बेझंटबाईंबद्दलचे अहल्याजींचे चिंतन मननीय आहे, “भारताचे अध्यात्मिक पुनरुज्जीवन आणि शाळांमधून भारतीयत्वाचा सर्वोच्च मूल्य म्हणून पुरस्कार हे त्यांचे (डॉ ॲनी बेझंट यांचे) स्वप्न. इंग्रजी शिकावे, पाश्चात्यिकरण नको. शिक्षणाने व्यक्ती मुक्त, स्वतंत्र बनावी. संस्कृत, प्राचीन भारतीय तत्वज्ञान, इतिहास आणि महत्त्वाचं म्हणजे स्पर्धा आणि भिती यांपासून दूर राहण्याची खोलवर रुजलेली भारतीय परंपरा यांचा अभ्यास व्हावा असे त्यांना अभिप्रेत होते”. अहल्याजींची ही नोकरी, ती एका शिक्षिकेच्या व्यावसायिक जीवनाची उत्तम सुरवात होती. शिक्षकत्व ही आपल्या हृद्याची हाक आहे हा साक्षात्कार त्यांना होणार होता.

प्रगत शिक्षणाच्या पाश्चिमात्य लाटा नि भारतातील तदनुषंगिक विकासाचे पडसाद वसंत महाविद्यालयात पोहोचले. विश्वात्मक मन आणि मुल्ये तसेच शक्य तितके स्पर्धेपासून दूर राहणे यावर भर द्यायचे महाविद्यालयात ठरले. बनारसमधील वास्तव्याच्या या काळाचे अहल्याजींच्या जीवनप्रवासासाठी एक विशिष्ट महत्त्व आहे. १९४० च्या त्या काळात शैक्षणिक, अध्यात्मिक, विकासात्मक आणि सांस्कृतिक अशा भिन्न प्रवाहांतून त्यांचं मन तयार होत होतं. वसंत महाविद्यालयातील त्या दहा वर्षांत शिक्षिका, शिक्षणतज्ञ आणि मुलांची पालक म्हणून वावरतांना त्यांची स्वत:ची वाढ होत होती बौद्धीक आणि अध्यात्मिकही.

बनारसमध्ये भेटलेल्या अनेकानेक उल्लेखनीय सहकारी आणि मित्रमंडळीपैकी एकाचा अहल्याजींच्या जीवनावर आत्यंतिक प्रभाव राहिला. श्रीमती बेझंट यांच्या छायाचित्राशेजारी याही व्यक्तीचे छायाचित्र घराच्या दर्शनी भागात पाहतच तर त्या मोठ्या झाल्या. यावेळपर्यंत थिऑसॉफिकल सोसायटीच्या शिकवणीपासून वेगळ्या अशा स्वत:च्या विचारांनी ज्या जे कृष्णमूर्ती या झंझावाताने जगाला जिंकले होते तेच हे व्यक्तिमत्व!

राजघाटावरील अनुभवांतून अहल्याजींना सावधानता, लहान मुलाला समजून घेण्याची संवेदनशीलता आणि तरूण मनांचे आकलन यामध्ये कसे संतुलन साधावे यासंबंधी शिकता आले. स्वातंत्र्य, बुद्धीमत्ता, परिवर्तन, जबाबदारी आणि व्यवस्थापन अशा विविध विषयांवरील चर्चांमधून जीवनाचा नवा आयाम

सापडला आणि स्वत:ची उन्नती साधता आली. निसर्ग आणि भवतालाला अत्यंत काळजीपूर्वक आणि तरल संवेदनांसह भेटण्यासाठी या ठिकाणी शिक्षक आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळत राहिले.

दुर्दैवाने १९४२ ते ४८ या काळात भारतातील अस्वस्थता शिगेला पोहोचलेली. भारतीय राष्ट्रीयत्वाच्या आजूबाजूस पसरत चाललेल्या लाटेने अहल्याजी आणि त्यांचे सहकारी यांच्या विश्वासांना आव्हान दिले. गांधीजी, जवाहरलाल, सरोजिनी नायडू, सरदार पटेल इत्यादी त्या काळातल्या दिग्गजांना एकाग्रतेने लक्ष देऊन ऐकतांना भारावून गेल्याचे ते क्षण आज त्याबद्दल बोलताना बाईंच्या मनात ताजे होतात. १५ ऑगस्ट १९४७ च्या रात्री “नियतीशी करार” हे नेहरूंचे इतिहासप्रसिद्ध भाषण ऐकण्यासाठी बाई त्यांच्या काही मित्रमंडळींबरोबर दिल्लीत हजर होत्या. तिरंग्याचे आरोहण हा रोमांचकारी क्षण, त्या क्षणाला फाळणीचे गालबोट तसेच निरपराध्यांची हत्या, मृत्यू आणि विध्वंस रोखता न आल्याची रुखरुखही होती. युद्ध आणि हिंसा यांचा आणखी एक अनुभव बाईंसाठी. स्वातंत्र्य कशाचे नि कसे याचे चिंतन करीत मंडळी बनारसला परतली.

युद्ध संपल्यानंतर जानेवारी १९४८ मध्ये जे कृष्णमूर्ती बनारसला परतले तेव्हाची ही गोष्ट आहे. कृष्णमूर्तींना पहिल्यांदा ऐकलं तो मूलभूत जाणीवांना धक्का देणारा अनुभव होता. “राष्ट्रीयत्व ही विषवल्ली आहे हे तुम्हाला दिसत का नाही?” त्यांनी सभागृहाला प्रश्न केला. “कोणत्याही प्रकारचे युद्ध ही दुष्प्रवृत्तीच ना? आणि युद्धासाठी तुम्ही जबाबदार नाहीत? तुमच्यामधील हिंसेपासून तुम्ही मुक्ती का मिळवली आहे? इतरांपेक्षा का तुम्ही भिन्न आहात?”

“ओह! प्रश्नांची ही सरबत्ती झेलायला कठीण होती. पण सखोल दु:ख आणि आत्यंतिक करूणेच्या स्त्रोतातून उमटलेल्या त्या शब्दांनी आम्ही स्तब्ध झालो.” बाईंची स्मृती छेडली जाते. त्यानंतर तिथून कधीच मागे फिरणे नव्हते. बाईंना कळाले की त्यांचा गुरूचा शोध तिथे संपलेला आहे. बनारसमध्ये कार्यरत असताना उत्तम प्रशिक्षणातून त्यांच्यामध्ये जागलेली शिक्षणाची आस कृष्णजींच्या भाषणानंतर अधिक तीव्र झाली. सन १९५१ मध्ये बाई अभ्यासासाठी दिल्लीला निघून गेल्या ही त्याचीच परिणती.

१९५० ते ६० चा काळ. दिल्ली कात टाकून नव्या जीवनासाठी सिद्ध झालेली, सृजनाच्या लहरींनी सर्वत: वेढलेली. पंडित नेहरूंच्या वैज्ञानिक दृष्टीकोन रुजवण्याच्या ध्यासातून भारतामध्ये अनेक राष्ट्रीय विज्ञान प्रयोगशाळांची उभारणी होत होती. शिक्षणमंत्री मौलाना आझाद यांनी शिक्षणाला नवी दिशा देण्याची शपथच वाहिली होती. केंद्रीय शिक्षण संस्थान (सीआयई), नवी दिल्ली, शिक्षकांना प्रशिक्षण देणारी संस्था हा नवा प्रयोग आझादांच्या दृष्टेपणातून साकारला. आझादांनी गुरूदेव रविंद्रनाथ टागोरांचे शिष्य, प्राध्यापक अनंतनाथ बसू या प्रभृतीची संस्थाप्रमुख म्हणून तिथे नेमणूक केली.

हीच ती संस्था जिथे १९५१ साली अहल्याजी प्रथम विद्यार्थिनी म्हणून दाखल झाल्या. पाश्चिमात्य-शिक्षण-तत्वज्ञानातील नाविन्याची आस लागल्याने फुलब्राईट शिष्यवृत्ती घेऊन दोन वर्षे अमेरिकेमध्ये वास्तव्य केल्यानंतर परतलेल्या अहल्याजी याच संस्थेत व्याख्यात्या म्हणून रूळल्या. जवळजवळ पुढची दोन दशके शिक्षकांच्या प्रशिक्षणांत त्या रमून गेल्या होत्या. शिक्षकाची भूमिका केवळ ज्ञानवाही अशी नसून मुलांच्या संपूर्ण जीवनाकडे लक्ष देत त्यांच्या सहभागातून शिक्षण देणारे वातावरण त्यांच्यासाठी निर्माण करणे हा या संस्थेचा आदर्श क्वचितच कुठे पहायला मिळेलसा. आज असे आदर्श लुप्त झाले आहेत, बहुतेक महाविद्यालये बाजारू बनल्याचा अहल्याजींना खेद आहे.

भारतीय कला अणि संस्कृतीच्या क्षेत्रात नवी दालने उघडलेली १९५० च्या दशकाने पाहिली. सृजनात्मक उर्जेचा स्त्रोतच वाहिला तिथे. कमलादेवी चट्टोपाध्याय आणि पुपुल जयकर यांसारख्या दिग्गज महिलांनी पारंपारिक कला, कारागिरी आणि वस्त्रोद्योगांना जणू नवजीवन दिले नि भारतात खेडोपाडी पसरलेल्या असामान्य कसबी कलाकार नि कारागिरांचा अभिमान पुन्हा जागला.

१९६० चा आरंभ होता तो, अमेरिकन सरकारच्या आंतरराष्ट्रीय विकासखात्याच्या प्रतिनिधींचे (युएसएआयडी) चे शिष्टमंडळ कोलंबिया विद्यापिठाच्या शैक्षणिक सल्लागारांसह केंद्रीय शिक्षण संस्थानमध्ये आले होते. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (एनसीईआरटी) म्हणून पुढे नावारूपाला आलेल्या संस्थेच्या जन्माची शक्यता पडताळून पाहणे हा हेतू. औत्सुक्यापोटी अहल्याजी या कामगिरीवर बिनिच्या शिलेदार बनल्या. भारतातील शिक्षणविश्वात एक नवे स्वप्न त्यांनी पाहिले. ते साकारण्यासाठीची त्यांची स्वत:ची नि त्यांच्या त्या काळच्या सहकाऱ्यांची अविश्रांत मेहनत बाईंना आजही स्मरते. केंद्र आणि राज्यशासनाच्या समन्वयातून प्रगतीच्या वाटा धुंडाळण्याचा, त्यासाठी एकत्र चालण्याचा तो काळ होता.

एनसीईआरटी / एनआयई मध्ये अहल्याजी अभ्यासक्रम विभागाच्या प्रमुख होत्या. तिथे सर्व विषयांसाठीची पाठ्यपुस्तके त्यांनी बनवली. “मी आणि माझे सहकारी राज्याराज्यामधून गेलो. तिथल्या शिक्षण संचालकांच्या भेटी घेतल्या, नवा अभ्यासक्रम नव्या पाठ्यपुस्तकांतून शिकवण्याचा दृष्टीकोन समजावला. शिक्षकांना प्रशिक्षण दिले. खडतर होती कामगिरी” बाई सांगतात. १९६२-६९ ही सात वर्षे अहल्याजी एनसीईआरटीच्या सेवेत होत्या.

१९६१-६२ या वर्षी त्यांनी एडिंबरा विद्यापीठात उपयोजित भाषाविज्ञान या विषयाचे प्रशिक्षण घेतले. परतल्यावर एनसीईआरटीमध्ये “मातृभाषा-शिक्षण आणि इंग्रजी-शिक्षण” या प्रकल्पावर त्या कार्यरत होत्या. “पाठांतरावर भर असलेल्या भारतीय शिक्षणपद्धतीत वाचनाकडे दुर्लक्षच झालंय. मातृभाषा आणि इंग्रजी या दोन्हींसाठी विद्यार्थ्यांमध्ये वाचनकौशल्ये विकसित करणे गरजेचे आहे. अन्यथा पुढे जाऊन इतर विषय

समजून घेणं मुश्किल” असं बाईंचं निरिक्षण. हे आव्हान पेलण्यासाठी अहल्याजी आणि त्यांच्या चमुने वाचन-प्रकल्प सुरू केला. पुस्तकलेखन आणि मार्गदर्शक सामग्री बनविण्याची पूर्वतयारी म्हणून प्रदेशाप्रदेशांतून त्यांनी खूप भटकंती केली. प्राथमिक शाळेतील मुलांची मने वाचनासाठी तयार होतील अशाप्रकारच्या साहित्याची निर्मिती या चमुने केली.

१९६० च्या दरम्यान भारत सरकारने भुवनेश्वर, भोपाळ, मैसूर आणि अजमेर या चार स्थळी प्रादेशिक शिक्षण महाविद्यालयांची स्थापना केली. उद्याच्या शिक्षकांना घडवणं हे ध्येय. अहल्याजींना मैसुरच्या महाविद्यालयाच्या प्राचार्यपदासाठीचे निमंत्रण मिळाले होते.

अहल्याजींचे शिक्षक प्रशिक्षणातले संशोधन सुरूच होते इतक्यातच त्यांना भारत सरकारच्या केंद्रीय विद्यालयांची स्थापना या प्रकल्पाची सूत्रे हाती घेण्यासाठी विचारण्यात आले. इतका मोठा व्याप म्हणजे कार्यालयात फायलींचा ढीग हलविण्यातच आपले प्रशासन अशा कल्पनेने या कामासाठी आरंभीच्या काळात त्यांची नाराजीच होती.

पण लवकरच त्यांच्या लक्षात आले की प्रत्येक फायलीमागे एकेका माणसाची समस्या आहे. शिवाय केंद्रीय मंत्रीमंडळाने पारीत केलेल्या पंडित नेहरूंची स्वाक्षरी असलेल्या प्रस्तावात म्हटले होते, “या शाळांकडे केवळ केंद्रसरकारच्या सेवेतील बदलीची नोकरी करणाऱ्यांच्या मुलांसाठी भारतभर एकच अभ्यासक्रम मिळण्याची सोय म्हणून पाहू नये तर अखंड-भारत ही संकल्पना मुलांच्या मनात विकसित करण्याची संधी म्हणून त्या ओळखल्या जाव्या". इथे बाईंना एक भव्य संधीची आशा दिसली. कार्याला अर्थ प्राप्त झाला. एकतेचा संदेश पोहोचवण्यासाठी शाळांना भेटी देणे, मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्याशी वार्तालाप करणे हे सारे आता करता येणार होते.

अहल्याजी सांगतात, “मेजर जनरलच्या मुलाशेजारी सैनिकाचा मुलगा बसलेला असतो, मणिपूरची मुले त्रिवेंद्रममध्ये लोकनृत्य सादर करतात हे दृष्यच केवळ मस्तच! भारतासारख्या इतकी विविधता असणाऱ्या देशात अशा प्रकारच्या शाळांची भूमिका आजसुद्धा खूप महत्त्वाची आहे”.

मग इतके सगळे सोडून १९७३ मध्ये राजघाट एज्युकेशन सेंटरमध्ये वाराणसीला का गेल्या त्या? या माझ्या प्रश्नावर एक दीर्घ विराम घेऊन त्या सांगतात, “तो निर्णय स्वाभाविकपणे झाला आणि त्या वेळी घेण्याचा तोच सर्वात उचित निर्णय होता”. कृष्णमूर्तींना काही दशकांपासून त्या ऐकत आल्या होत्या, काही छोट्या सत्रांतून त्यांच्याशी संवाद साधण्याची संधी त्यांना मिळाली होती, काही एक अंतरापर्यंत कृष्णजींच्या मार्गाने त्या चालल्या होत्या. अर्थातच प्रत्यक्षात कृष्णजींबरोबर काम करण्याची आता त्यांना ओढ लागली होती. काही मूलभूत प्रश्नांवर चिंतन करणे जरूरी होते आणि कृष्णमूर्ती अभ्यासकेंद्राचा परिसर हेच त्यासाठी अत्यंत पूरक असे ठिकाण होते.

अहल्या चारींनी आपले संपूर्ण जीवन शिक्षणक्षेत्रासाठी वाहून घेतले, आजही त्यांचा कर्मयज्ञ चेन्नई कृष्णमूर्ती फौंडशनच्या विश्वस्त या नात्यातून सुरूच आहे. आमच्या मुलाखतीनंतर लगेचच त्यांना भेटायला आलेल्या शिक्षकांच्या एका गटाला त्यांनी शिक्षणक्षेत्रातील त्यांच्या अनुभवांबद्दल, आधुनिक काळातील आव्हानांबद्दल आणि एकंदरीतच शाळा या संकल्पनेबद्दल आस्थेने प्रश्न विचारले. त्यांच्या या प्रश्नांनी गटातील प्रत्येकालाच आपण अंतर्मुख होऊन विचार करण्याची गरज आहे याची जाणीव झाली. खरंच हे काही योग्यतेचं आहे का? तुमच्या जीवनांत आणि आपल्या शाळेतील कामकाजात आज जिज्ञासा, चिकित्सा ही कितपत शिल्लक आहे? स्वातंत्र्य या संकल्पनेचा शाळेच्या संदर्भात अर्थ आपल्याला लावता आला आहे? स्वातंत्र्याची मर्यादा कुठे आखाल? प्रश्नांची ही मालिका सुरूच राहणार होती.

लेखन :- शगुफ्ता सिद्धी
(फर्स्ट क्वार्टर्स माईंड्फिल्ड्स, 2010)

अनुवाद: अंबुजा साळगांवकर
(२८ फेब्रुवारी २०१४)